# वार्तापत्र

## गडचिरोली पोलीस दलातील शौर्यपुर्ण कामगीरी व खडतर सेवा बजावणा-या जवानांचा सन्मान

-o-

गडचिरोली जिल्हयात शौर्यपुर्ण कामगिरी करणा-या व नुकतेच भारत सरकारने घोषित केलेल्या राट्रपतीचे शौर्य पदक गडचिरोली पोलीस दलात शौर्यपुर्ण कामगिरी करण्या-या १२ जवानांना व नक्षलग्रस्त भागात खडतर सेवा बजावणा-या २५५४ अधिकारी व जवानांना खडतर सेवा पदक घोषित झाले आहे.

गडचिरोली जिल्हयातील जंगलव्याप्त भागात आपल्या प्राणाची बाजी लावुन नक्षल्यांशी लढणा-या अधिकारी व जवानांना शौर्यपदक जाहीर करण्यात आले असुन, राष्ट्रपतीचे पोलीस शौर्य पदक प्राप्त करणा-यामध्ये शहीद-स्वरुप अमृतकर व शहीद दोघे आत्राम यांना मरणोत्तर शौर्य पदक जाहीर करण्यात आले. २२ मार्च २०१५ रोजी एटापल्ली तालुक्यातील हीक्केर येथे नक्षल्यांशी चकमक उडाली होती. या चकमकीत जिकीरीने मुकाबला करुन स्वत:च्या प्राणाचे बलिदान देणारे शहीद- स्वरुप अमृतकर व दोघे आत्राम यांना मरणोत्तर शौर्य पदक जाहीर करण्यात आले आहे.

सध्याचे यवतमाळचे पोलीस अधिक्षक- एम. राजकुमार सर, सपोनि-नितीन माने, सपोनि - प्रफुल्ल कदम, सपोनि-विजय रत्नपारखी, पोउपनि -दत्तात्रय काळे, पोउपनि- प्रमोद भिंगारे सपोउपनि/ १३३१ मोतीराम मडावी, पोहवा/१९६१ मल्लेश केडमवार, नापोशि/१६८३ जितेंद्र मारगाये, नापोशि/८३० गजेद्र सोन्जाल या अधिकारी व जवानांना राष्ट्रपतीचे शौर्य पदक जाहीर करण्यात आले आहे. तसेच नक्षलग्रस्त भागात खडतर सेवा बजावणारे २५५४ पोलीस अधिकारी व जवानांना महाराष्ट्र शासनाचे खडतर सेवा पदक घोषित करण्यात आले आहे.

मा. डॉ. अभिनव देशमुख पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी पदक प्राप्त अधिकरी व जवानांचे कौतुक करुन आपल्या प्राणाची पर्वा न करता देशसेवेसाठी लढणा-या पदकप्राप्त अधिकारी व जवानांना अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत व भविष्यातही गडचिरोली पोलीस दल अशी उल्लेखनिय कामगिरी करेल असा विश्वास व्यक्त केला आहे.